REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# १९९० नंतरच्या आदिवासी कवितेचे स्वरुप

**प्रा.डॉ.बाळासाहेब गार्डी**
पदव्यूत्तर मराठी अध्ययन व संशोधन केंद्र, रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर.

**प्रास्ताविक :-**




मराठी साहित्यामध्ये आदिवासी कवितांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. भारतीय समाजामध्ये आदिवासी म्हणून संबोधल्या गेलेल्या समुहांना अनुसूचित जमातीचा दर्जा घटनेत देण्यात आलेला आहे. आदिवासी या संज्ञेस आदिम जाती, वनजाती, वनवासी, निरिजन अशा अनेक संज्ञा वापरण्यात येतात, पण या संज्ञेस काही अभ्यासकांचा, विचारवंतांचा विरोध आहे. कारण उत्तर अमेरिका व ऑस्ट्रेलियाच्या धरतीवर आदिवासींचा अर्थ त्या प्रदेशातील मुळचे रहिवासी असा होतो. भारतातील सर्वच आदिवासी त्या त्या देशातील मूळ निवासी आहेत, याबाबत विरोधकांचे एकमत झाले आहे.

'आदिवासी साहित्य' म्हणून ज्या साहित्याचा नामनिर्देश केला जातो, तो साहित्यप्रवाह इ.स. १९६० नंतर जसे ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, जनवादी असे अनेक साहित्य प्रवाह आहे. त्याचबरोबरच साहित्यप्रवाह आला आणि जवळजवळ तो अधिकाअधिक व्यापक होत गेला. सुरुवातीच्या काळात आदिवासी हे एक बालबोध साहित्य म्हणून त्याकडे मराठी साहित्यिकांनी पाहिले. त्यामुळे त्याची दखल आजपर्यंत कोणीही घेतलेली नाही. प्रगल्भ मराठी साहित्याने आणि दलित साहित्याने आणि साहित्याच्या व्यासपिठांनाही त्याची दखल घेतलेली नाही. ती काही घेतलेली असेल, ती अत्यंत अल्प प्रमाणात, व तीही वास्तविक आदिवासी इतर साहित्यिकांनी अनुकरणातून अथवा थोड्या अधिक माहितीच्या आधारे साहित्याची निर्मिती केली असेल.

मराठी साहित्यात वास्तविक 'आदिवासी साहित्य' हे खऱ्या अर्थाने साहित्याचे मूळ आहे. त्याचा कर्ता कोण? सांगता येत नाही. कारण लिखित स्परुपाचे साहित्य निर्माण होण्याआधी साहित्याची परंपरा ही आदिवासींमध्ये होती. ते मौखिक साहित्य आजतागायत एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे येत आहे. मग त्यामध्ये लोककथा, लोकगिते, म्हणी, उखाणे, गुराखी गीते, वाक्‌प्रचार, कोडी, लोकभ्रम, लोकसमजूती, रुढी-परंपरा हा आदिवासी साहित्याचा आद्यप्रकार म्हणता येईल. खरे तर त्यांचे हे साहित्य अक्षरवाङ्मय आहे. अलिकडे नवशिक्षित आदिवासींना एकूणच मराठी साहित्याच्या अभ्यासातून अशी एक जाणिव झाली की, या साहित्यात आदिवासींच्या जल, जंगल, जमीन, निसर्ग, नद्या, पशु-पक्षी, रुढी, परंपरा अथवा आदिवासींचे कुपोषण, अन्याय, अत्याचार, शोषण, दारिद्र्य, गुलामगिरी वेठबिगारी असे अनेक प्रश्न मराठी साहित्यात कुठेच नाहीत आणि त्यांच्याविषयी लिहावे असे अनेक विद्वान साहित्यिकांनाही वाटते. त्यामुळे आदिवासी साहित्य प्रवाह हा दलित साहित्य प्रवाहाशी जवळचा वाटत असला तरी आदिवासी साहित्याच्या काही प्रेरणा, जीवनजाणिवा या पूर्णपणे भिन्न आहेत. त्यामुळे आदिवासी साहित्य प्रवाह सन १९६० नंतर रुढ झाला. परंतु खऱ्या अर्थाने सन १९९० नंतर नवशिक्षित आदिवासी साहित्यिकांकडून त्याची मांडणी होऊ लागली. यामध्ये कथा, कविता, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, नाटक इत्यादी वाङ्मयप्रकारानुसार साहित्यलेखन झाले. या साहित्य वाङ्मयप्रकारामध्ये विशेषतः नव्वदोत्तरी आदिवासी कविता याचा आपण शोध घेणार आहोत.

१९९० नंतरच्या आदिवासी कवितेत विचार करतांना नव्वदपूर्वी बोटावर मोजण्याइतपत आदिवासी कविता संग्रह होते. त्यात 'मोाहोळ' हा प्रतिनिधिक काव्यसंग्रह असून त्याचे संपादन भुजंग मेश्राम यांनी केले आहे. तर प्रभू राजगडकर (१९५२) 'मेटा पुंगार' (१९६२) सुखदेव बापू उईके, 'गोंडवन पेटले' (१९८७) विनायक सुमरात्र 'गोधड' (१९८७) वाहरु सोनवणे हे होते. परंतु खऱ्या अर्थाने ही सुरुवात असली तरी या कवितासंग्रहातील येणाऱ्या जीवन जाणिवांचे दर्शन आदिवासी जीवन परंपरेतून घडविले आहे. आदिवासी साहित्य हे समाजजीवनाचे मूल्य आहे. आदिवासी दुःखाचे संदर्भ वेगळे आहेत. त्यांचे प्रश्न वेगळे आहेत. त्यांची उत्तरे सुध्दा वेगळ्या

पध्दतीने शोधावी लागतील. म्हणून आदिवासी साहित्याचा प्रवाह हा वेगळा ठरतो आणि हे साहित्य म्हणजे आमच्या वैशिष्ट्यांचा शोध देखील ठरतो. म्हणून या कविता आपल्या या कवितांमधून फक्त साहित्याचा नव्हे तर एकूण आदिवासी समुहाचा आणि जीवनाचा शोध आणि वास्तव मांडले आहे. त्यातून आदिवासी कवितेची सशक्त परंपरा सुरु झाली.

१९९० नंतरच्या आदिवासी कवितामध्ये भुजंग मेश्राम यांचा 'उलगुमान' (१९९०) प्रकाशित झाला आणि आदिवासी कवितेची पहाट होऊन सगळीकडे चैतन्य आणि क्रांतीचे वारे वाहू लागले. कारण १९६० नंतर भुजंग मेश्राम यांनी जल, जंगल, जमीन आदिवासींच्या ताब्यातून जाणे, आदिवासींचे वनवासीकरण करणे, धरणग्रस्त होणे, प्रकल्पग्रस्त होणे, आदिवासींच्या शासन सवलतींची लूट, लाचार आणि नंतर गुलाम बनविणे, याचे वास्तव चित्रण भुजंग यांनी पाहिले आणि अनुभवले होते. त्याचे पडसाद त्यांच्या कवितेतून उमटताना दिसतात. कवी (अभुजमाड) कवितेत म्हणतो,

आईन मोक्यावर कोण आले हे बालीस्टर
नझय तगाई खावटीचा बटोडा कराले
त्यायला मने फिकर यवदी आमची
की शंबर टक्के सबसिडी
आट एकच, नाव बदला लागण

अशा वनवासी किंवा धरणग्रस्त म्हणून सतत विस्थापित होणाऱ्या आदिवासींची स्थिती व्यक्त करतो. निसर्ग हिच आदिम जीवनाची आणि साहित्याची प्रेरणा आहे. तसेच निसर्ग शक्तींना देव मानून त्याची पूजा करण्याची धारणा त्या मनात ओतप्रोत भरलेली आहे. स्वाभाविकपणे आपण जगताना सृष्टिशी एकरुप होत होतो. समृध्द व्हावे ही जीवन धारणा आहे. ही धारणा कवितेतून व्यक्त होतांना काही शाश्वत मूल्यांसह व्यक्त होते. 'वणसुर्य'(१९९०), पुरुषोत्तम शेळमाके 'जागवा आणि पेटवा मशाली' (१९९१) वामन शेळमाके, 'म्होरकी' (१९९७) उषा किरण आत्रम, 'मनोगत' (१९९७) माधव सरकुंडे यासारख्या कवींच्या कवितांमधून आजचे आदिवासी समाजाची धारणा, नवी दिशा आणि आदिवासी समाज आणि संस्कृतीची मर्मस्थळे, आदिवासी समाजात होणारे बदल, आदिवासी जीवनाची घालमेल, आदिवासींचे स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करण्याच्या धडपडीबरोबर अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार करण्याची शक्ती, संघर्षासाठी दोन हात करण्याची तयारी या साऱ्यांचे चित्रण या कवितेतधून येते.

'मनोगत' (१९९७) माधव सरकुंडे, 'अनुभूती' डॉ. गोविंद तिरकामठा (१९९९), सुनिल कमरे 'पतुसा' (१९९९), कृष्णकुमार चांदेकर, 'रान आसवांचे ताळे' (१९९८), सौ. कुसुम आलम, 'रानपाखरांची माय' (२०००), सौ. कुसुम आलम, 'सुक्कासुकूम' (२००२), वसंत कनाके, 'पाखरं' बाबाराव मडावी, 'टाहरा' (२०११), दशरथ मडावी, 'पहाडी हुंकार' - पी. डी. आत्राम, 'पानझडी' डॉ. संजय लोहकरे, 'ही वाट तिथुन जावी' शंकर बळी 'काजवा' आत्राम, 'लेखणीच्या तलवारी' उषा किरण आत्राम (२००९), 'अभुजमाड' भुजंग मेश्राम, 'गीत परिवर्तनाचे' - रामराजे आत्राम, 'आदित सुगंध युक्त', डॉ. निलकांत कुळसंगे, 'गोंडी काव्य' विठ्ठलसिंह धुर्पे 'गोंडवनातला आक्रंद' मारोती उईके, 'ऋणमुक्ती' बी. डी. आडे, 'मी तोडले तुरुंगाचे द्वार' माधव सरकुंडे, 'ब्लॅक इन ब्युटी' (अनु.) प्रा. माधव सरकुंडे शतकातील आदिवासी कविता संपादित डॉ. विनायक तुमराम 'रानफुलांच्या कविता' (संपा.) डॉ. संजय लोहकरे 'पाऊसपाणी', 'विसावा', 'ईश्वरतेच्या ललना', 'विरप्पा गैंडर', 'धिक्कार', 'तुझ्या पत्रातील अक्षर', 'दाग-दी-मोमेंटस्' , 'आय लिव्ह विथ', 'आय आणि माय', 'आदिवासींचे अस्तित्व' आणि 'अस्मिता' एवढे कवितासंग्रह रा. ची. जंगले यांच्या नावावर आहे. 'आदिम-विद्रोह' हिरामण पाडवी, 'शेतावरची गाणी', 'ढवळा पठेकर', वळीव तुकाराम धांडे, 'मी महासत्तेच्या दाराशी कटोरा घेऊन उभा राहणारी नाही' - सुनील अवचार, 'झडप' देवदत्त चौधरी अलिकडेच आलेला 'आदिवासींच्या लिलावाचा प्रजासत्ताक देश डॉ. संजय लोहकरे असे एकामागून एक अनेक आदिवासी कविंच्या कवितासंग्रह आले. आणि आदिवासी काव्यांचे दालन समृध्द होताना अनेक जीवन जाणिवांच्या बरोबर अनेक प्रश्न काव्याच्या रुपाने मांडले आहेत. कवी कृष्णकुमार चांदेकर 'पतुसा' या काव्यसंग्रहातील आरक्षण या कवितेत म्हणतात,

अजुनही माझी माय घरात नागवी राहून
लेकीला बाहेर पाठविले किंवा लेकीला नागवी ठेवून
मात्र घराबाहेर निघते
आणि त्यांच्या दिवसातून दहा साड्या

फरणाऱ्या मायलेकी
एकाच वेळी सिनेमात जाऊन बसतात
तरी भडवे म्हणतात
यांना आरक्षणाची गरज काय?

कुठे आहे परिवर्तन? आदिवासींच्या नवपिढीतील कवींनी ज्वलंत प्रश्न हाती घेऊन एकूण समाजातील प्रस्थापित समात व विस्थापित मागास समाजामध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विषमता कवी निर्भिडपणे मांडतो आहे. तरीही हा समाज आरक्षण मागतो आहे. हे समाजवास्तवाचे भान आजच्या कवितेत आहे.

कवी तुकाराम धांडे हा अलिकडच्या दशकातील अत्यंत संवेदनशिल निसर्ग कवी व समाजवास्तवाचे भान आलेला कवी म्हणून लोकप्रिय आहे. सह्याद्रीतील कवी म्हणून त्यांची वेगळी ओळख आहे. कवी तुकाराम धांडे आपल्या 'वळीव' या कवितासंग्रहातील 'आई' या कवितेतून आईचेच नव्हे तर सबंध आदिवासींचे जगणं मांडतो, पुढे तो म्हणतो,

आई होती तेंव्हा
मला कडेवर घेऊन पाण्याला जायची
पाठीवर बांधून शेतात काम करायची
मातेचं अन् मातीच छान जमायच
दिवसभर त्या एकमेकांशी हितगुज करायच्या
त्यांच बोलण मात्र कुणालाच नाही समजायच
शेवटी तुकाराम त्या मातीलाच विचारतो
तिचं एकच म्हणणं असायच बाळ
माझ्या नंतर माझ्या बाळाला सांभाळ

अडाणी आदिवासी स्त्री मातीशी कशी एकनिष्ठ असते, माता आणि माती जणू दोन बहीणी आहेत, असे समजून आपल्यानंतर मुलांना सांभाळण्याचे वचन ती मातीकडून घेते. हेच जगण आणि एकजीव होणं, हीच खरी आदिवासी साहित्याची जाणीव आहे. ह्यांची 'सर्वे', 'सुधारणा', 'भुगोल', 'खोबण', 'साहेब' अशा अनेक कवितांतून कवी तुकाराम धांडे म्हणतात, आम्ही पारतंत्र्यात सुखी होतो. स्वातंत्र्यानंतर आमचं स्वातंत्र्यच हिरावून घेतलं, म्हणूनच देशाच स्वातंत्र्य आम्हाला शाप वाटतयं, थोडक्यात काय, तर माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी माणसांची लोकशाही राज्यव्यवस्थेत अखंड धडपड चालू आहे.

कवी रा.चि. जंगलं यांच्या 'आय आणि माय' या कविता संग्रहातील 'पर्णकुटी', 'आईची आठवण', 'आपुन तर माणूस आहे' या सारख्या कवितांमधून आपले संपूर्ण आत्मकथा मांडली आहे. हे सांगताना नोकरी, मुलबाळ, शिक्षण, भटकंती, काळजी, ओढ, चिंता, विराह तसेच कुटुंबातील संघर्ष, तो थांबवण्यासाठी करावी लागणारी ओढाताण आणि एकूण आदिवासींच्या स्वच्छंदी जीवनाला, संस्कृतीला कुठेतरी खोल दरीत घेऊन जाणारी वाट आहे. प्रखर चित्रण ते करतात.

संसार दुखःमुळ, असतो चोहीकडे इंगळ
जगा इतरांना जगवून, मी सांगतो तुम्हाला

आपण आयुष्यभर माणूसपण जपाव, वाटेल तेवढे सहकार्य करावे हि भावना तो व्यक्त करतो.

१९९० नंतर आदिवासी कवीपैकी निवडक कविता आणि कवी यांचा या लेखनात आढावा घेण्यात आलेला आहे. एकूण आदिवासी कवींची कविता ही आदिवासी जीवन जाणीवांतून, निसर्ग आदिमतेपासून प्रेरणा घेऊन निर्माण झालेली दिसते. जन्म, जंगल, जमीन, माती माता, नदी या निसर्ग जाणीवा ठेवून ज्या प्रस्थापित व्यवस्थेने हाजारो वर्षापासून छळल, त्यांना सगळया सुविधांपासून वंचित ठेवले आणि लाचारीची वागणूक दिली अशा वनवासी म्हणजेच आदिवासी कवींनी पुढे होवून त्यांचे वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यानंतरही गरीबी, दुःख, दारिद्रय, शोषण, अत्याचार यासारखे प्रश्न अजून काही भागात आहेत. या व्यवस्थेविरुध्द आपला राग, संताप व्यक्त करणारी कविता या कवींनी व्यक्त केले आहे. त्याचबरोबर विद्रोह व संघर्षासाठी नवे बळ, सामर्थ्य देणारी कविता निर्माण झाली. त्यामुळे आदिवासी समाजात आपला हक्क, स्वाभिमान त्यांच्या मनात जागृत झाला. त्याचप्रमाणे दलित-आदिवासी मूक संवेदनांना मूर्त रुप या निमित्ताने आले आहे. आदिवासींच्या नावाखाली पोट भरणारे वनवासी कल्याण आश्रयाचे सहकार्याने पत, प्रतिष्ठा

मिळवण्यासाठी लाचार साहित्यिक, कार्यकर्ते, समाजसेवक यांचा समाचार या कवितांतमन येतो. आदिमांचया नात्यातील कष्ट करणारी माणसं, पोटाची खळगी भरण्यासाठी डोंगर, दऱ्या-खोऱ्यात भटकणारी माणसं माणुसकीला कसे जपतात एकमेकांची भूक जाणणारी, प्रेम आणि जिव्हाळ्याला जपणारी माणसं निसर्गाशी एकरुप होतात. त्यांच्या जगण्यातील आदर्श, हेच खऱ्या अर्थाने मानवी तत्त्वज्ञान असल्याचा संदेश या कवितांतून मिळतो. आदिवासीयांचे वास्तव या कवितांतून पहावयास मिळते.

- **संदर्भसूची :-**


०१. लोहकरे संजय, 'कवी आणि कविता', मेघा पब्लिशिंग हाऊस, अमरावती, २००४.

०२. गारे गोविंद, 'अनूभूती', आदिम-साहित्य, पुणे, १९९४.

०३. लोहकरे संजय, 'पानझडी', अक्षता प्रकाशन, पुणे, २००१.

०४. आत्राम, 'कविता-काजवा', कविता प्रकाशन, धुळे, ७ मे २०१०.

०५. रोंगटे तुकाराम, 'आदिवासी कवितेचा उषःकाल आणि सद्यस्थिती', संस्कृती प्रकाशन, पुणे, २००७.